# महाराष्ट्र शासन

## सहसंचालक ( उच्च शिक्षण), नागपूर विभाग,

## जुनी मॉरीस कॉलेज इमारत, सिताबर्डी, नागपूर ४४० ००१

Website:www.jdnagpur.in Email: jdhengp@rediffmail.com

Phone No.0712- 2561713 Fax No.0712- 2554210


क्रं.उशिनाग/केंद्र पुरस्कृत शिष्यवृत्ती/ 7374 /२०२१ दिनांक 15/११/२०२१

प्रति,

१. कुलसचिव,रा.तु.म, नागपूर विद्यापीठ, नागपूर
२. कुलसचिव,कवि कुलगुरू कालीदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक
३. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
४. कुलसचिव, विधी विद्यापीठ, नागपूर
५. सहसंचालक, तंत्रशिक्षण, सदर, नागपूर
६. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण सिव्हील लाईन, नागपूर
७. उपसंचालक, शालेय शिक्षण, विभाग, नागपूर
८. संचालक, शासकीय/सर्व प्राचार्य अशासकीय अनुदानित/विना अनुदानित/कायम विना अनुदानित महाविद्यालये/संस्था नागपूर विभाग, नागपूर

**विषय :- उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रशासन पुरस्कृत अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजनेची NSP पोर्टलवरून सन 2021-22 साठी प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत**

**संदर्भ :- संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं /शिष्य/केंद्र पुरस्कृत अल्प./२०२१-२२/१३३३२/ दिनांक १५.११.२०२१**

केंद्रशासनाच्या एन.एस.पी. पोर्टलद्वारे उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राज्यात अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी देण्यात येणारी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजनेची ऑनलाईन पद्धतीने अंमलबजावणी करण्यात येत आहे. (११ वी ते पीएच.डी, व्यावसायिक, (डी.एड., बी.एड., एम.एड., आय.टी.आय.) सर्व डिप्लोमा व अकरावी/ बारावी स्तरांवरील एम.सी.व्हि.सी.) या अभ्यासक्रमासाठी देण्यात येते. सदर शिष्यवृत्तीसाठी महाराष्ट्र राज्याकरिता नवीन (Fresh) शिष्यवृत्तीसाठी. ४७५७५ संच निर्धारित केलेले आहेत.

सन २०२१-२२ करीता दि. १८ ऑगष्ट २०२१ पासून योजनेसाठी एनएसपी पोर्टलवरून शिष्यवृत्ती अर्ज मागविण्याची अंतिम मुदत ३० नोव्हेंबर २०२१ अशी आहे. शिष्यवृत्ती योजनेची प्रभावी अंमलबजावणी करणेसाठी संचालनालयाच्या संदर्भीय पत्रान्वये वेळोवेळी सूचना देऊनही अद्यापही अर्जांच्या संख्येत वाढ होतांना दिसून येत नाही. तसेच याबाबत केद्रशासन व राज्य शासनाकडून विविध आढावा बैठकीमध्ये सर्व पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अर्ज भरणेसाठी सूचना देणेबाबत कळविले आहे.

तरी याबाबत पुनःश्च कळविण्यात येते की, आपल्या संस्था/ महाविद्यालयातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना सदर शिष्यवृत्तीसाठी ऑनलाईन अर्ज भरणेसाठी तात्काळ सूचना देण्यात याव्यात. तसेच ज्या विद्यार्थ्यांना मागील वर्षी शिष्यवृत्ती मंजूर झालेली आहे, अशा विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीच्या नुतनीकरणाचा अर्ज भरणे आवश्यक आहे.

तसेच एन.एस.पी. पोर्टलद्धारे सर्व महाविद्यालयांना Aadhar base लॉगीन करण्याची सुविधा देण्यात आलेली आहे. तरी सन २०२१-२२ पूर्वी ज्या महाविद्यालयांनी KYC पूर्ण कले आहेत, अशा महाविद्यालयांनी त्यांच्या NSP Portal वर Institute लॉगीनमध्ये आधार व मोबाईल नंबर नोंदणी (Register) करणे आवश्यक आहे. तसेच सन २०२१-२२ साठी नवीन महाविद्यालय/ संस्था यांची KYC करण्याबाबतची प्रक्रिया NSP Portal च्या Home Page वरील Service

Scanned with CamScanner

Option वर Institute KYC Registration Form मध्ये देण्यात आलेली आहे. सदर Form भरल्यानंतर State Nodal Officer द्वारे सदरच्या भरलेल्या तपशीलाची पडताळणी करून त्यांना ऑनलाईन पद्धतीने युजर आयडी व पासवर्ड मिळेल.

केंद्रशासन पुरस्कृत अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजनेपासून एकही पात्र विद्यार्थ्यां शिष्यवृत्तीबाबतची माहिती न मिळाल्यामुळे शिष्यवृत्तीपासून वंचित राहील्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य, विद्यापीठामधील विद्यार्थ्यांबाबत संबंधित विद्यापीठाचे कुलसचिव याची राहील. तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दि. १८.११.२०२१ पर्यंत या कार्यालयास सादर करावा.

तसेच संबंधित विभागाने आपल्या अधिनस्थ असलेल्या संस्था / महाविद्यालयांना याबाबत सूचित करण्यात यावे.

**(डॉ. संजय ठाकरे)**
**सहसंचालक, उच्च शिक्षण,**
**नागपूर विभाग, नागपूर**

Scanned with CamScanner

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१

web: www.dhepune.gov.in E-mail: schol.dhepune@gov.in

फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६११११५३


क्र.उशिसं/ शिष्य/ केंद्र पुरस्कृत अल्प./२०२१-२२/93332 दिनांक- १३.११.२०२१
15 NOV 2021

इमेलद्वारा तात्काळ

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण विभाग.

**विषय : उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रशासन पुरस्कृत केंद्रशासन पुरस्कृत अल्पसंख्यांक विद्यार्थ्यासाठी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजनेची NSP पोर्टलवरुन सन २०२१-२२ साठी प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत.**

संदर्भ :१) संचालनालयाचे पत्र क्र. उशिस/शिष्यवृत्ती/ पीएमएस/२०२१-२२ दि. ३०.८.२०२१
२) संचालनालयाचे पत्र क्र. उशिस-२०२१-२२ केंद्र पुरस्कृत शिष्यवृत्ती /१११९१ दि. १८.१०.२०२१

केंद्रशासनाच्या एन.एस.पी. पोर्टलद्वारे उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राज्यात अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी देण्यात येणारी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजनेची ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करण्यात येत आहे. (११ वी ते पीएच्.डी ,व्यावसायिक, (डी.एड्., बी.एड्., एम.एड्., आय.टी.आय.) **सर्व डिप्लोमा व अकरावी / बारावी स्तरांवरील एम.सी.व्ही.सी.)** या अभ्यासक्रमासाठी देण्यात येते. सदर शिष्यवृत्तीसाठी महाराष्ट्र राज्याकरीता नवीन (Fresh) शिष्यवृत्तीसाठी ४७५७५ संच निर्धारित केलेले आहेत.

सन २०२१-२२ करीता दि. १८ऑगस्ट २०२१ पासून योजनेसाठी एनएसपी पोर्टलवरुन शिष्यवृत्तीसाठी अर्ज मागविण्याची प्रक्रिया सुरु झालेली असून, विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत ३० नोव्हेंबर २०२१ अशी आहे. शिष्यवृत्ती योजनेची प्रभावी अंमलबजावणी करणेसाठी संचालनालयाच्या संदर्भिय पत्रान्वये वेळोवेळी सूचना देऊनही अद्यापही अर्जांच्या संख्येत वाढ होतांना दिसून येत नाही. तसेच याबाबत केंद्रशासन व राज्य शासनाकडून विविध आढावा बैटकीमध्ये सर्व पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अर्ज भरणेसाठी सूचना देणेबाबत कळविले आहे.

तरी याबाबत पुनःश्च कळविण्यात येते की, आपल्या विभागामधील शिष्यवृत्ती पात्र असलेल्या सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांची आढावा बैठक आयोजीत करुन, त्यांचे महाविद्यालयांमधील सर्व पात्र अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना सदर शिष्यवृत्तीसाठी ऑनलाईन अर्ज भरणेसाठी तात्काळ सूचना देण्यात याव्यात. तसेच ज्या विद्यार्थ्यांना मागील वर्षी शिष्यवृत्ती मंजूर झालेली आहे, अशा विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीच्या नुतनीकरणाचा अर्ज भरणे आवश्यक आहे.

Scanned with CamScanner

तसेच NSP पोर्टल द्वारे सर्व महाविद्यालयांना Aadhar base लॉगीन करण्याची सुविधा देण्यात आलेली आहे तरी सन २०२१-२२ पूर्वी ज्या महाविद्यालयांनी KYC पूर्ण केले आहेत, अशा महाविद्यालयांनी त्यांच्या NSP Portal वर Institute लॉगीन मध्ये आधार व मोबाईल नंबर नोंदणी ( Register) करणे आवश्यक आहे. तसेच सन २०२१-२२ साठी नवीन महाविद्यालय /संस्था यांची KYC करण्याबाबतची प्रक्रीया NSP Portal च्या HOME Page वरील Services Option वर Institute KYC Registration Form मध्ये देण्यात आलेली आहे. सदर Form भरल्यानंतर State Nodal Officer द्वारे सदरच्या भरलेल्या तपशीलाची पडताळणी करून त्यांना ऑनलाईन पध्दतीने युजर आयडी व पासवर्ड मिळेल.

केंद्रशासन पुरस्कृत अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजनेपासून एकही पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीबाबतची माहिती न मिळाल्यामुळे शिष्यवृत्तीपासून वंचित राहील्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत महाविद्यालयाचे प्राचार्य, विद्यापीठामधील विद्यार्थ्यांबाबत संबंधित विद्यापीठाचे कुलसचिव यांची राहील. याबाबतच्या सूचना तात्काळ संबंधितांना देण्यात याव्यात. तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दि. १८.११.२०२१ पर्यंत संचालनालयास सादर करावा.

(प्रतिभा श्री. दीक्षित)
कनिष्ठ प्रशासन अधिकारी
उच्च शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य पुणे - १

प्रत- माहिती व कार्यवाहीस्तव,

१. मा. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, ०३ महापालिका मार्ग, मुंबई
२. मा. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, सेंट जॉर्ज हॉस्पिटल आवार, मुंबई
३. मा. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, ०३ महापालिका मार्ग, मुंबई.
४. मा. संचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, भांबुर्डा, पुणे.
५. मा. संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-०१
६. मा. कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, म्हसरुळ, वणी , दिंडोरी रोड नाशिक-४२२ ००४.
७. मा. कुलसचिव, महाराष्ट्र पशुविज्ञान विद्यापीठ, फुटाला लेक, नागपूर ४४० ००१
८. मा. कुलसचिव, सर्व कृषि /अकृषि /अभिमत विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.

सदर शिष्यवृत्ती साठी आपल्या अधिनस्त महाविद्यालयांमधील अभ्यासक्रमांना प्रवेशित विद्यार्थी पात्र आहेत, तरी याबाबत सूचना संबंधित सर्व महाविद्यालयांमार्फत पात्र विद्यार्थ्यांना देण्यात याव्यात. ही विनंती.

प्रत - माहितीस्तव सविनय सादर.

१) मा. अप्पर मुख्य सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय मुंबई.
२) मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई.

Scanned with CamScanner